'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019), | April-2021
Special Issue - 264 : India's Sustainable Development Goal in 21st Century
Peer Reviewed Journal

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना : एक दृष्टीक्षेप

विष्णू प्रल्हाद भिंगारदेव
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना राज्यातही अधिक लोकप्रिय झालेली आहे. गोरगरीबांच्या उपजिविकेच्या संसाधनाचा पाया मजबूत करणे, सामाजिक सहभागाची सुनिश्चिती व पंचायत राज संस्था बळकट करणे ही या योजनेची मुलभूत वैशिष्ट्ये आहेत. यात वैयक्तिक व सार्वजनिक स्वरुपाच्या कामांच्या मागणीमध्ये निश्चितच वाढ होत आहे. सन 2017-18 च्या तुलनेत सन 2018-19 मध्ये कामांच्या मागणीत वाढ होऊन कामांच्या संख्येतही वाढ झालेली आहे.

सदर योजनेचे लाभ सर्वांपर्यंत पोहोचावे यासाठी विभागाने दुरचित्रवाणी, वर्तमानपत्रातील जाहिरात, योजनेचा स्टॉल व चित्ररथ यांच्या माध्यमातुन तसेच एक दिवस मजुरांसोबत इत्यादी नवीन संकल्पना कार्यान्वित केल्या आहेत.

जलयुक्त शिवार अभियानासोबत सांगड घालुन जलसंवर्धनाच्या कामांवर भर दिल्यामुळे गावातील पाण्याच्या साठ्यात निश्चित वाढ होईल. गावाचा सर्वांगीण विकास होण्याकरीता योजनेंतर्गत पांधण रस्ता, गोठा, नॅडेप कंपोष्टींग, वनीकरण, इत्यादी कामे घेण्यात आलेली आहेत.

राज्य रोजगार हमी योजना विभागामार्फत "मागेल त्याला शेततळे" ही महत्वाकांक्षी योजना सुरु करण्यात आली असुन त्या अंतर्गत 16 मे, 2019 अखेर 1,21,829 इतकी शेततळी पूर्ण करण्यात आली तर 3,390 इतकी शेततळी प्रगतीपथावर आहेत.

नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपुर, गोंदिया व नागपूर या पाच जिल्ह्यांना धडक सिंचन विहीर अंतर्गत एकुण 11,614 विहीरींचा लक्षांक देण्यात आला असून 20 मे, 2019 अखेर 10,908 सिंचन विहीरी पुर्ण करण्यात आल्या, तर 686 इतक्या विहरींची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच "समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजना" अंतर्गत अनुज्ञेय वैयक्तिक व सार्वजनिक लाभाची 11 प्रकारची कामे सन 2017-18 व 2018-19 या वर्षामध्ये प्राधान्याने मोठ्या प्रमाणात राबविण्यात आलेली आहेत.

**योजनेची पार्श्वभुमी**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी 1977 पासून महाराष्ट्रात सुरु झाली. राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 नुसार दोन योजना सुरु होत्या.

1) ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरीता रोजगार हमी योजना.

2) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 कलम 12 (ई) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना.

सदर योजनांचा राज्य शासनाच्या निधातुन अर्थसहाय्य केले जात होते.

सन 2005 मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (विद्यमान नाव - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा) लागू केला. तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम 28 अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती. तदनुसार महाराष्ट्र शासनाने सन 2006 मध्ये पुर्वीचा कायदा

ठेवण्याचा पर्याय स्विकारला आहे. मात्र, विधानमंडळाने केंद्रीय कायद्यास अनुसरुन राज्यास निधी मिळविण्याच्या अनुषंगाने 1977 च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल झाला आहे.

सद्यःस्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम 1977 (दिनांक 6 ऑगस्ट, 2014 पर्यंत सुधारित) अंमलात आहे व या कायद्यांतर्गत खालील दोन योजना सुरु आहेत :

अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र (MGNREGS) या योजनेंतर्गत केंद्र शासन 100 दिवस प्रतिकुटुंब रोजगाराची हमी देते व 100 दिवस प्रतिकुटुंब मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. प्रतिकुटुंब 100 दिवसावरील प्रत्येक मजुराच्या, मजुरीवरील खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.

ब) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 सुधारित कलम (12) (ई) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अनुदान तत्वावर प्रतिपुर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.

उदा. : 1) जवाहर / धडक सिंचन विहीर योजना

2) मागेल त्याला शेततळे योजना

3) नागपूर विभागात 11000 विहीरींचा धडक कार्यक्रम

याशिवाय राज्य शासनाचा निधीपुढील बाबीं करिता वापरला जातो

1) राज्य रोजगार हमी योजनेतील प्रगतीपथावरील अपुर्ण (कुशल) कामे पुर्ण करण्याकरीता.
2) राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याकरीता

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची उद्दिष्टे :**

अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला योजनेंतर्गत 100 दिवस प्रतिकुटुंब रोजगाराची हमी देण्यात आली असुन, त्या माध्यमातुन स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे हे या योजनेचे मुळ उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी / शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातुन रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे, तसेच पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करण्यावर योजनेत भर देण्यात आला आहे. जिल्ह्यात हाती घेण्यात येणाऱ्या सर्व कामांच्या एकुण किंमतीच्या प्रमाणात कमीतकमी 60 टक्के कामे ही, उत्पादक स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणारी असावीत व अशी कामे ही भूमी, जल व वृक्ष यांचा विकास करणारी कृषि व कृषिसंलग्न क्षेत्राशी निगडीत असावीत.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्ट्ये :**

18 वर्षावरील प्रौढ व्यक्तींना केंद्र शासनाची 100 दिवस प्रतिकुटुंब अकुशल रोजगाराची हमी. तर 100 दिवसांवरील प्रत्येक मजुराला रोजगाराची राज्य शासनाची हमी.

**मजुरांची नोंदणी व जॉबकार्ड :**

- रोजगार मिळविण्याकरीता जॉबकार्ड आवश्यक
- जॉबकार्डसाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज करणे आवश्यक
- ग्रामपंचायत मार्फत नोंदणी
- 15 दिवसांत जॉबकार्ड मिळणार

- प्रत्येक कुटुंबाला विनामुल्य फोटोसह एक जॉबकार्ड

**कामाची मागणी व अर्ज :**

- रोजगार आवश्यक असणाऱ्या नोदंणीकृत व्यक्तीने वेळोवेळी नमुना क्रमांक 4 मध्ये अर्ज करणे आवश्यक.
- नमुना क्रमांक 4 ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध.
- नमुना क्रमांक 4 मध्ये अर्ज केल्यानंतर ग्रामपंचायतीने पोचपावती देणे आवश्यक.
- रोजगाराची मागणी नोंदणीकृत व्यक्ती किंवा समूह नमुना क्रमांक 4 मध्ये करु शकतो.
- मजुराने किमान 14 दिवस कामाची मागणी करणे आवश्यक.
- मागणी केल्यानंतर मजुराला 15 दिवसात ग्रामपंचायतीने रोजगार पुरविणे आवश्यक, अन्यथा बेरोजगार भत्ता अनुज्ञेय.
- कामाच्या मागणीबाबत ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी यांना तात्काळ माहिती द्यावी.
- गावापासुन 5 कि.मी. परिसरात रोजगार उपलब्ध केला जाईल, अन्यथा जास्त अंतराकरीता प्रवास खर्चाची तरतुद.
- ग्रामपंचायतीव्दारे पुर्ण गावातील कामांचे नियोज.

**मजुरीचे दर :**

- रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना देण्यात येणाऱ्या मजुरीचा दर केंद्र शासन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 मधील कलम 6 नुसार प्रत्येक वर्षी निश्चित करते.
- केंद्र शासन प्रत्येक वर्षी मजुरीचे दर ठरविते व ते केलेल्या कामाच्या प्रमाणात (मोजमापानुसार) मजुरांना अदा केले जाते.
- केंद्र शासनाने राज्यासाठी खालीलप्रमाणे मजुरीचे दर निश्चित केले आहेत.

| अ.क्र. | वर्ष | मजुरीचा दर (रु.) |
|---|---|---|
| 1 | 2017-18 | 201/- |
| 2. | 2018-19 | 203/- |

**सोयी व सुविधा :**

- कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, प्रथमोपचार, विश्रांतीसाठी शेड, 5 पेक्षा जास्त लहान मुले असल्यास दायीची सोय.
- मजुरीचे विलंब प्रदाने टाळण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रामार्फत ग्रामपंचायत स्तरावरुन ई-मस्टर काढण्याबाबत शासन निर्णय दि.23 एप्रिल, 2018 रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
- बँकेव्दारे अथवा पोस्टामार्फत 15 दिवसात मजुरीचे प्रदान, अन्यथा 0.05 टक्के विलंब आकार देय.
- मजुरांना वेतन चिठ्ठीचे वाटप.

**मनुष्यदिवस निर्मिती :**

योजनेंतर्गत सन 2018-19 ह्या वर्षात 846.01 लाख इतकी मनुष्यदिवस निर्मिती झाली आहे. राज्यात निर्माण झालेल्या एकुण 846.01 लाख मनुष्यदिवस निर्मितीपैकी सर्वात जास्त मनुष्यदिवस निर्मिती गोंदिया

E-ISSN : 2348-7143
April-2021

जिल्ह्यात (88.68 लाख) झालेली आहे. त्या खालोखाल अमरावती (84.84 लाख), चंद्रपुर (55.78 लाख), भंडारा (53.56 लाख), धुळे (38.98 लाख) ह्या जिल्ह्यात झालेली आहे.

**अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व महिलांचा सहभाग :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत सन 2017-18 या वर्षात योजनेंतर्गत निर्माण झालेल्या एकुण मनुष्यदिवस निर्मितीमध्ये अनुसूचित जमातीचे प्रमाण 20.06%, तर अनुसुचित जातीचे प्रमाण 9.68% इतके होते. तर, 2018-19 या वर्षात हेच प्रमाण अनुक्रमे 19.96% व 10.54% इतके आहे.

| अ.क्र. | तपशिल | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|
| | | 2017-18 | 2018-19 |
| 1. | महिला | 45.48% | 44.87% |
| 2. | अनुसूचित जमाती | 20.06% | 19.96% |
| 3. | अनुसूचित जाती | 9.68% | 10.54% |

**महिलांचा सहभाग :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत महिला व पुरुषांमध्ये भेदभाव न ठेवता समान मजुरीचे दर ठेवण्यात आले आहेत. योजनेमध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणे (किमान 33 टक्के) गरजेचे आहे. योजनेंतर्गत राज्यामध्ये निर्माण झालेल्या एकुण मनुष्यदिवस निर्मितीमध्ये सन 2017-18 या वर्षात 45.48 टक्के इतका सहभाग महिलांचा होता. तर 2018-19 या वर्षात महिलांचा सहभाग 44.87 टक्के इतका आहे.

**कुटुंबाला 100 दिवसापेक्षा जास्त रोजगार :**

सन 2017-18 या वर्षात योजनेत सहभागी झालेल्या 16.98 लाख कुटुंबापैकी 1.98 लाख कुटुंबाना 100 दिवसापेक्षा जास्त दिवस रोजगार पुरविण्यात आला. तर 2018-19 या वर्षामध्ये योजनेत सहभागी असलेल्या 17.93 लाख कुटुंबापैकी 1.89 लाख कुटुंबाना 100 दिवसांपेक्षा जास्त दिवस रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला.

**योजनेंतर्गत राज्यात 100 दिवसांपेक्षा जास्त रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुबांची संख्या :**

(आकडे लाखात)

| तपशिल | | वर्ष | |
|---|---|---|---|
| | | 2017-18 | 2018-19 |
| योजनेंतर्गत रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या एकुण कुटुंवाची संख्या | कुटुंवाची संख्या | 16.98 | 17.93 |
| | मनुष्यदिवस निर्मिती | 825.32 | 846.01 |
| 100 दिवसापेक्षा जास्त दिवस रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंवाची संख्या | कुटुंवाची संख्या | 1.98 | 1.89 |
| | मनुष्यदिवस निर्मिती | 133.75 | 136.99 |

**प्रतिकुटुंब सरासरी मनुष्यदिवस निर्मिती :**

योजनेंतर्गत 2017-18 ह्या वर्षात प्रतिकुटुंब सरासरी 49 दिवस एवढी मनुष्यदिवस निर्मिती झाली होत, तर 2018-19 या वर्षात प्रतिकुटुंब सरासरी 47 दिवस एवढी मनुष्यदिवस निर्मिती झालेली आहे. देशांतर्गत प्रतिकुटुंब सरासरी 51 दिवस एवढी मनुष्यदिवस निर्मिती झाली आहे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र योजनेंतर्गत अनुज्ञेय कामे**

**प्रवर्ग अ : नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक बांधकामे**

(एक) पेयजल स्त्रोतांसह भूजलाचे पुनर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमिगत पाट, मातीची धरणे, रोधी धरणे, संरोधी धरणे यासारखी भुजल स्तर वाढविणारी व त्यात सुधारणा करणारी जलसंधारणाची व जलसंचयाची बांधकामे;

(दोन) व्यापक पाणलोट क्षेत्र प्रक्रिया करता येईल असे समतल चर, मजगी घालणे, समतल बांध, दगडी संरोधक, दगडमातीचे कक्षबांध (गॅबियन संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यांसारखी जलव्यवस्थापन विषयक कामे ;

(तीन) सूक्ष्म व लघु पाटबंधाऱ्याची कामे व सिंचन कालवे व नाली बांधणे, त्यांचे नुतनीकरण करणे व परिरक्षण करणे;

(चार) सिंचन तला व इतर जलाशये यांमधील गाळ उपसण्यासह पारंपारिक जलाशयांचे नूतनीकरण करणे;

(पाच) परिच्छेद 4 मध्ये अंतर्भुत असलेल्या कुटुंबांना फलोपयो घेण्याचा रीतसर हक्क मिळवून देईल असे, सर्व सामान्य व वन जमिनींवरील सडक पट्ट्या, कालवा बांध, तलाव अग्रतट (टँक फोरशोअर) आणि किनारी पट्टे यावरील वनरोपण, वृक्षरोपण, वृक्षलागवड आणि फलोत्पादन ;

(सहा) सामुहिक जमिनीवरील भूविकासाची कामे.

**प्रवर्ग ब : दुर्बल घटकाकरीता व्यक्तिगत मत्ता (फक्त परिच्छेद 4 मध्ये उल्लेखिलेल्या कुटुंबाकरीता) :**

(एक) भूविकासामार्फत तसेच खोदविहीरी, शेततळी व इतर जलसंचयाच्या संरचनांसह सिंचनाकरिता योग्य त्या पायाभूत सुविधा उभारुन परिच्छेद 4 मध्ये विनिर्दिष्ट कुटुंबांच्या जमिनींची उत्पादकता वाढवणे;

(दोन) फलोत्पादन, रेशी उत्पादन, रोपमळा व प्रक्षेत्र वनीकरण यामार्फत उपजीविकेची साधने वाढवणे ;

(तीन) परिच्छेद 4 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कुटुंबाच्या पडीक अथवा उजाड जमिनी लागवडीखाली आणण्याकरीता त्या जमिनींचा विकास करणे;

(चार) इंदिरा आवास योजनेंतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाच्या अशा अन्य योजनेंतर्गत मंजुर केलेल्या घरांच्या बांधकामामधील अकुशल वेतन घटक ;

(पाच) पशुधनाला चालना देण्याकरीता कुक्कुटपालन संरचना, शेळीपाल संरचना, वराहपालन संरचना, गुरांचा गोठा, गुरांना चारा देण्यासाठी गव्हाणी व पाणी देण्यासाठी हाळ यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणे; आणि

(सहा) मत्सव्यवसायाला चालना देण्याकरीता मासे सुकविण्यासाठी ओटे, साठवण सुविधा यांसारख्या तसेच सार्वजनिक जमिनीवरील हंगामी जलाशयांमधील मत्स्यशेतीला चालना देण्याकरीता पायाभूत सुविधा निर्माण करणे.

**प्रवर्ग क : राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांकरिता सामाईक पायाभूत सुविधा**

(एक) जैविक खतांकरिता आवश्यक असणाऱ्या शाश्वत पायाभूत सुविधा उभारुन आणि कृषि उत्पदनांसाठी पक्या स्वरुपाच्या साठवण सुविधांसह हंगामोत्तर सुविधा उभारुन कृषि उत्पादकतेस चालना देण्याबाबतची कामे; आणि

(दोन) स्वयं-सहाय्यता गटांच्या उपजिविकेच्या उपक्रमांकरिता सामाईक कार्यकक्ष

**प्रवर्ग ड : ग्रामीण पायाभुत सुविधा :**

(एक) हगणदारीमुक्त गावाचा दर्जा संपादन करण्याच्या उद्देशाने एकतर स्वतंत्रपणे किंवा शासकीय विभागाच्या इतर योजनांच्या अभिसरणातून व्यक्तिगत घरगुती शौचालय, शाळेतील प्रसाधनगृहे, अंगणवाडी-प्रसाधनगृहे आणि विहित मानकांनुसार घनकचरा व सांडपणी व्यवस्थापन यांसारखी ग्रामीण स्वच्छते संबंधातील कामे

(दोन) रस्त्यांनी न जोडलेल्या गावांना बारमाही ग्रामीण रस्त्यांनी जोडणी आणि निश्चित करण्यात आलेली ग्रामीण उत्पादन केंद्रे विद्यमान पक्या रस्त्यांच्या जाळ्याशी जोडणे; आणि गावामधील पार्श्व नाली व मोऱ्या यासह अंतर्गत पक्के रस्ते अथवा मार्ग बांधणे.

(तीन) खेळाची मैदाने उभारणे.

(चार) ग्राम व गट स्तरावर पूरनियंत्रण व संरक्षण कामांसह आपत्कालीन सिध्दता ठेवणे अथवा रस्ते पूर्ववत करणे अथवा इतर आवश्यक सार्वजनिक पायाभूत सुविधांचे पुनर्स्थापन करणे, सखल भागात जलनिःस्सारण व्यवस्थेची तरतुद करणे, पुराचे पाणी वाहुन नेणारे प्रवाह मार्ग खोल करणे व त्यांची डागडुजी करणे, प्रवनिकेचे नूतनीकरण करणे, तटीय क्षेत्राच्या संरक्षणासाठी नाल्याचे (स्टॉर्म वॉटर ड्रेन) बांधकाम करणे.

(पाच) ग्राम व गट स्तरावर ग्रामपंचायती, महिला स्वयं-सहाय्यता गट, संघ, चक्रीवादळ छावणी, अंगणवाडी केंद्रे, गाववाजार व स्मशानभुमी इत्यादींकरीता इमारती बांधणे.

(सहा) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, 2013 (2013 चा 20) याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरीता अन्नधान्य साठवण इमारती बांधणे.

(सात) अधिनियमांतर्गत करावयाच्या बांधकामाचा अंदाजाचा भाग म्हणून त्याकरिता लागणाऱ्या बांधकाम साहित्याची निर्मिती करणे.

(आठ) अधिनियमांतर्गत निर्माण केलेल्या ग्रामीण सार्वजनिक मत्तांचे परिरक्षण करणे.

(नऊ) राज्य शासन यासंदर्भात अधिसूचित करील अशी इतर कोणतीही कामे; आणि

(दहा) केंद्र सरकार राज्य शासनाशी विचारविनिमय करुन अधिसूचित करेल असे अन्य कोणतेही काम.

- प्रत्येक ग्रामपंचायत, स्थानिक क्षेत्राची क्षमता, स्थानिक गरजा व साधनसंपत्ती विचारात घेऊन व परिच्छेद 8 च्या तरतदीनुसार, ग्रामसभेच्या सभांमध्ये प्रत्येक कामाचा प्राधान्यक्रम निर्धारित करेल.
- गवत कापणे, खडीकरण करणे, शेतीची कामे यांसारखी अमुर्त स्वरुपाची, मोजता न येण्याजोगी व वारंवार उदभवणारी कामे हाती घेण्यात येणार नाहीत.

**संदर्भ सुची :**


- प्रा.मोराळे मन्मथ, - "हमी रोजगाराची साथ केंद्राची"
- प्रा.निखले अर्जुन - "कशी राबवाल ग्रामीण हमी योजना"
- महाराष्ट्र शासन - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - वार्षिक अहवाल
- दास्ताने संतोष - महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेचा चिकित्सक अभ्यास
- वी.स.पात्रे - बेकारी निर्मुलनातुन ग्रामीण विकास
- पटेल सुजाता - महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना, समाज परीवर्तनाचे एक साधन


RESEARCHJOURNEY